Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

Received: 21/May/2024 IJRAW: 2024; 3(6):113-116 Accepted: 28/June/2024

# मराठवाडा मुक्तिसंग्रामातील नांदेड जिल्हयाचा सहभाग

*[1]मिलिंद पुंडलिकराव जाधव

*[1]सहशिक्षक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा भोकर, जि.नांदेड, महाराष्ट्र, भारत।

**सारांश**

भारताला स्वातंत्त्य मिळाल्यानंतर तब्बल तेरा महिण्यांनी मराठवाड्याला स्वातंत्त्य मिळाले. मराठवाड पूर्वी हैद्राबाद संस्थानात होता. हैद्राबाद संस्थान हे भारतामध्ये विलिन होण्यास तयार नव्हते. ते स्वतःचे राष्ट्र निर्माण करू पाहत होते परंतू तत्कालीन गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाने पोलीस ॲक्शन घेण्यात आली आणि शेवटी 17 सप्टेंबर 1948 रोजी ते भारतात विलीन झाले. 17 सप्टेबर 1948 ला मराठवाडा निजामाच्या गुलामीतून मोकळा झाला व स्वातंत्र्य मिळाले।

मराठवाडा मूक्तीसंग्राम या नावाने हा लढा ओळखला जातो. या लढ्यामध्ये अनेक चळवळी झाल्या, आंदोलने झाली, अनेक स्वातंत्र्यवीरांना आपले प्राण गमवावे लागले. निजाम व रझाकारांचे अत्याचार सहन करत गावागावात स्वातंत्र्याचे वारे पेटले होते।

मराठवाडयातीतील जनतेचे या लढ्यात खूप मोठे योगदान होते. या लेखात मराठवाडा मुक्तिसंग्रामातील नांदेड जिल्हयाचा सहभाग या विषयी माहिती देण्यात आली आहे।

**मुख्य शब्द:** मराठवाडा, हैद्राबाद, निजाम, रजाकार।

## प्रस्तावना

### स्वातंत्र्याची पहाट

नांदेड जिल्हा हैदराबाद संस्थानात होता. त्यामुळे स्वातंत्र्याची पहाट पाहण्यासाठी नांदेडसह मराठवाडयातील जनतेला १५ ऑगस्ट १९४७ नंतर तब्बल एका वर्षाची प्रतीक्षा करावी लागली. हैदराबादच्या जूलमी अत्याचारी रझाकार व निजाम सरकारच्या त्रासाने येथील जनता अक्षरशः होरपळून गेली होती.जनतेच्या लढयाने व भारतीय लष्कराच्या पोलिस ॲक्शनमुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्यात स्वातंत्र्याची पहाट उगवली.

## पार्श्वभूमी

ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये भारतात 563 संस्थाने होती, त्याचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक बघत असत त्यापैकी एक म्हणजे हैदराबाद होय. या संस्थानाची स्थापना हैदराबाद राज्याचे स्थापना मीर कमरुद्दीन निजाम यांनी सतराशे चोवीसमध्ये केली होती. सतराशे चोवीस ते एकोणिसशे अठ्ठेचाळीस पर्यंत हे राज्य अस्तित्वात होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. सुमारे दीडशे वर्षाच्या गुलामगिरीच्या श्रृंखलेतून भारताला मुक्ती मिळाली. मात्र मराठवाड्यातील जनता अजूनही पारतंत्र्यातच होती. हैदराबाद राज्य हिंदुस्थानच्या मध्यभागी वसलेले राज्य होते. हिंदुस्तानात असलेल्या देशी राज्यात काश्मीर राज्य आकाराने सर्वात मोठे व हैदराबाद राज्य आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते.१८ जुलै १९४७ मध्ये ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कायद्यानुसार १५ ऑगस्ट१९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतातील सर्व देशी राज्ये आणि संस्थानिक राज्य संघराज्यात विलीन झाली.

हैदराबाद राज्याचा सत्ताधीश सत्ताधीश मीर उस्मान अली खान आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले.देशाच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हे राज्य स्वतंत्र राहणे देशाच्या हिताचे तर नव्हतेच त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणारच नव्हते.

हैदराबाद राज्यातील राज्यांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण यासाठी अनेक सशस्त्र आंदोलने झाली. स्वातंत्र्यसंग्रामाची सुरुवात सर्वप्रथम आर्य समाजाने आणि त्यानंतर हैदराबाद स्टेट काँग्रेसने या आंदोलनाचे नेतृत्व केले.

हैदराबाद राज्यामध्ये आर्य समाजाने निजाम सरकारच्या विरोधात २४ ऑक्टोबर १९३८ मध्ये पहिला सत्याग्रह केला. निजाम सरकारने आर्य समाजावर सार्वजनिक सभा घेण्यास बंदी घातली होती.हा आदेश मागे घ्यावा धार्मिक सण आणि उत्सवावरील निर्बंध दूर करावेत. आर्य समाजाच्या नियतकालिके, वृत्तपत्राच्या प्रकाशन यावर घातलेली बंदी मागे घ्यावी, हिंदूंना आपले सण व उत्सव साजरे करण्याचे स्वातंत्र्य असावे आर्य समाज मंदिरासमोर यज्ञ यज्ञकुंड, होमहवन करण्यास समाजाच्या लोकांना स्वातंत्र्य असावे, निजी पाठशाळेवर लावलेली बंधने काढून टाकावेत अशा मागण्यांसाठी निजाम सरकारच्या विरोधात सत्याग्रह सुरू केला. १९ जुलै १९३९

*Corresponding Author: मिलिंद पुंडलिकराव जाधव

मध्ये आर्यसमाजाच्या राजनैतिक धार्मिक व सामाजिक स्वरूपाच्या सर्व मागण्या मान्य केल्या.

ऑगस्ट १९४५ रोजी आर्य समाजाने सत्याग्रह स्थगित केला. आर्य समाजाचे नेते महात्मा नारायण स्वामी यांना सरकारने तुरुंगात टाकले होते.त्यावेळी अनेक चळवळी झाल्या आर्य समाजी कार्यकर्त्यांची बलीदाने झाली.

हैदराबाद राज्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी पुणे १९३८ रोजी हैदराबाद येथे काशिनाथराव वैद्य यांच्या घरी एक बैठक घेऊन हैदराबाद स्टेट काँग्रेस या राजकीय संघटनेची स्थापना केली या बैठकीत स्टेट काँग्रेसचे एक समिती नियुक्त करण्यात आले व त्यात स्टेट काँग्रेसचे ध्येयधोरणे करण्यात आली त्यात हैदराबाद राज्यातील जनतेचे प्रश्न सोडवणे ध्येय धोरण होते. यावर हैदराबाद राज्याचे पंतप्रधान यांनी स्टेट काँग्रेसवर बंदी घातली.स्टेट काँग्रेस ही जातीय स्वरूपाची आहे आता सरकारने आक्षेप घेतला घेतला.स्टेट काँग्रेसचे नाव बदलावे असाही ही सरकारने आग्रह धरला पण स्वामीजी (स्वामी रामानंद तीर्थ जे मराठवाडा मुक्ति संग्रामाचे अग्रगण्य होते) यांनी बदलले नाही. सुरुवातीस स्टेट काँग्रेसचे नेते मवाळ असल्यामुळे ते सरकारला विरोध करू शकले नाहीत कारण ते सरकार व घटनात्मक मार्गावर निष्ठा बाळगणारे होते. महात्मा गांधीनाही अहिंसात्मक चळवळ मान्य नव्हती.स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू आ.कृ.वाघमारे यांनी परभणीच्या काही मंडळी सह गोविंदराव नानल यांची भेट घेतली काँग्रेसचे अध्यक्ष बनवले व कृती समिती स्थापन करण्यात आली.ही सत्याग्रहींची पहिली तुकडी होय. गोविंदराव नानल यांनी आपल्या चार सहकार्यांचं हैदराबादला सुलतान बाजार येथे सत्याग्रह सुरू केला व त्या वेळी पोलिसांनी त्या सर्वांना अटक केली व संस्थानातील पहिल्या अहिंसक प्रतिकाराचा आणि संघर्षाचा झाला प्रारंभ झाला.

### वंदे मातरम् सत्याग्रह

हैदराबाद स्वातंत्र्य आंदोलनाचे सुरुवात मराठवाड्यातील औरंगाबाद (आताचे छ.संभाजीनगर)या शहरातून वंदे मातरम या सत्याग्रहातून झाली.राज्यात हैदराबादला उस्मानिया विद्यापीठ तर औरंगाबाद (छ संभाजी नगर), वरंगल व गुलबर्गा येथे इंटरमिजिएट कॉलेज होती. औरंगाबादच्या कॉलेजमध्ये गोविंदभाई श्रॉफ हे गणिताचे शिक्षक होते. ते व विष्णु गोविंद कर्वे यांनी विद्यार्थ्यांना देशभक्ती निर्माण केले म्हणून गोविंदभाईंना नोकरीवरून कमी केले. कॉलेजच्या वस्तीग्रहात हिंदू विद्यार्थ्यांनी १४ नोव्हेंबर १९३० पासून कॉलेज प्रशासनाच्या प्रशासनाचा विरोध पत्करून प्रार्थना म्हणून वंदे मातरम गीत म्हणण्यास सुरुवात केली. वंदे मातरम चळवळीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना निजाम सरकारने शाळेतून काढून टाकले सरकारच्या दडपशाहीमुळे शैक्षणिक नुकसान झाले पण अशा सत्याग्रहामुळे संस्थानात जनजागृती झाली. कार्यकर्त्यांची यांची एक फळी निर्माण झाली आणि स्वातंत्र्य आंदोलनाचा पाया मजबूत होण्यास मदत झाली.

### झेंडा सत्याग्रह

१५ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारतीय स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करायचे स्टेट काँग्रेसने ठरवले १५ ऑगस्ट रोजी प्रत्येकाने आपल्या घरावर तिरंगा झेंडा लावावा, झेंडा सत्याग्रह करावा असे आवाहन स्वामीजींनी जनतेला केले होते. निजामाने मात्र तिरंगा ध्वज फडकवण्यात बंदी घातले होते ऑगस्ट १९४७ पासून राज्यात झेंडा सत्याग्रह सुरू झाला १८ पर्यंत चालू होता.

झेंडा सत्याग्रह करण्याचे आदेश दिले राज्यात भारतीय हातात घेऊन प्रभात फेऱ्या काढण्याचा आयोजित करणे सलामी देणे सावन जनतेला करण्यात आले निजामाची बंदी असूनही मराठवाड्यात १०४६ पेक्षा अधिक गावात झेंडा सत्याग्रह करण्यात आले.संघराज्यात झेंडा लावला तर दोन वर्षाची शिक्षा जाहीर केले तरीसुद्धा १५ ऑगस्टला नांदेडच्या स्टेशनवर झेंडा फडकविण्यात आला. केंद्राच्या पोस्ट ऑफिस वरही ध्वजाला सलामी देण्यात आली.नांदेडच्या एम्पीरियन बँकेच्या शाखेवर ही झेंडा लावण्यात आला.सतरा ऑगस्टला नांदेडला सराफ्यात झालेल्या झेंडा प्रकरणात बोधनकर व विनायकराव डोईफोडे यांच्यावर अटकेचे वॉरंट काढले डोईफोडे यांना अटक झाली.

हदगाव तालुक्यातील डोरलीला अशाच प्रकरणात गोळीबार झाला. तेथे झेंडावंदनाचा व जंगल सत्याग्रह हा कार्यक्रम आखला होता उमरी, पाथरड, सोनारी व आजूबाजूच्या खेड्यातील लोक पावसाची पर्वा न करता त्या गावी जमा झाले तामसा पोलिस ठाण्याच्या आमचा पोलिस ठाण्याचा अमिन पोलिसांना घेऊन त्या ठिकाणी येऊन केलेल्या गोळीबारात चौघांचा मृत्यू झाला.

हदगाव तालुक्यात असलेल्या शिरड गावी १५ ऑगस्ट १९४८ ला राष्ट्रीय झेंडा फडकवला व झेंड्याला सशस्त्र सैनिकांनी रायफली सलामी दिली या समारंभाला दक्षिणकर सर्कल इंस्पेक्टर, मंजिथराव देशमुख व इतर गावातील मान्यवर मंडळी हजर होते

भगवानराव गांजवे यांनी या झेंड्याला सलामी दिली.३२ गावे स्वतंत्र झाल्याची घोषणा यावेळी केली. या प्रकरणानंतर निजाम पोलिसांची घाबरगुंडी उडाली पण त्याआधी सीताखांडी, लालसिंग तांडा, आमठाणा तांडा असे काही तांडे पोलिसांनी जाळून टाकले. चितगीरीचे चंद्रू नाईक, त्याचा भाऊ लालसिंग व आणखी दोन तीन जणांचे पोलिसांनी खून केले त्याचा प्रमुख नाईक आनंदा मंचा पोलीस अत्याचाराला बळी पडला. उमरखेड कॅम्प कडून १५ ऑगस्ट हा दिवस निजामी हद्दीत साजरा करण्याची तयारी होती भोकर मधील सोनारी गावच्या लोकांनी दोघा पोलिसांना पकडून बंद करून ठेवले होते. सोनारीचे माली पाटील भुजंगराव त्यांनी गावाच्या संरक्षणासाठी बंदुका जमवल्या.बंदुकीच्या बारूद डबेच्या डबे तयार करून ठेवली होती.हैदराबादला पाठवून फुले (कॅप्स) मागविल्याची खबर मिळताच भोकर पोलीस ठाण्यातून दोन पोलीस झडती घेण्यासाठी पाठवले होते. भूजंगरावांनी त्यांना पकडून ठेवले होते.

या घटनेचे वृत्त पोहोचतात नांदेड जिल्ह्याच्या पोलिस अधिकाऱ्यांनी हैदराबादहून मदत मागवली मोठी फौज आली पण सामोपचाराने प्रश्न मिटवला होता.आठ दहा गावाचे गावकरी आठ-दहा गावांचे गावकरी सोनारीचे रक्षण करण्यासाठी धावून आले होते सुटका केल्यानंतर भुजंगराव यांना पकडले नाही.

### जंगल सत्याग्रह

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृती समितीने राज्यातील जनतेला जंगल सत्याग्रह करण्याचा आदेश दिला. सरकारची बंदी असताना मोह, ताडी, शिंदीची झाडे तोडून जंगल सत्याग्रह करण्याचे आदेश स्वामी रामानंद तीर्थ यांनी दिले.

या जंगल सत्याग्रहात तेवीस लाख शिंदीची झाडे तोडण्यात आले मराठवाड्यात २५ ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले

पाटनूर चा जंगल सत्याग्रह प्रसिध्द आहे. शेंबोली, नागेली, मुदखेड सर्कलमधील शेतकरी पाटनूरला जंगल सत्याग्रहासाठी जमा झाले कायदा मोडण्यासाठी प्रतीकात्मक जंगल सत्याग्रह करायचा होता परंतु शेतकऱ्यांनी अंजनी खैराचे झाडे सरपण तोडावेत असे तोडून साफ केले. त्यावेळी दहा अकरा लोक पकडले गेले आंदोलनाचा पवित्रा पाहून पोलिसांनी त्यांना सोडून दिले व नंतर मुदखेड खाण्यातून बाराशे लोकांवर एफआयआर निघाला.

नांदेड जिल्ह्यातील टेळकी येथील जंगल सत्याग्रह झाला. तेथे झालेल्या गोळीबारात रघुनाथराव हंबर्डे, मोतीराम लक्ष्मण, भिकाजी तुळशीराम व धोंडीबा काळे मरण पावले.किरगुळ शेतकऱ्यानी लेव्हीविरुद्ध लढा दिला व लढ्यात इथल्या शेतकऱ्यांनी पोलिसांना सळो कि पळो करून सोडले सरकार आणि कामात अडथळे म्हणून येथील चाळीस लोकांना किरगुळ ईटोली व आसपासच्या गावात जाऊन सरकारी कामात अडथळा आणला म्हणून पकडले स्वामीजी

व हैदराबादचे मजूर पुढारी व्ही.बी.राजू यांनी या भागाचा दौरा केला. किरगुळ, पळशी, म्हैसा, किनी, पाळज या गावांना भेटी दिल्या पाळजला त्यांनी मुक्काम केला होता. तेथील मल्लारेडी आपण कार्यकर्ते आपल्या गावच्या कार्यकर्त्यांना घेऊन सत्याग्रह केला. भोकर व म्हैसा येथील रझाकारांनी किनीमध्ये धाड टाकली सोने-नाणे लुटून किनी पाळज गावाची राखरांगोळी केली. भोजन्ना बोईलवाड, चिकू आयतालवाड, मुत्येन्ना नरसापुरे, श्रीमती पोसानबाई गोलवाड व अन्य दोन परगावचे मजूर यांचा खून केला.

गोविंद विनायक पानसरे हे जन्माने औरंगाबाद जिल्ह्यातले बदनापूरला इंटर पर्यंत शिक्षण झाल्यानंतर त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी सोडून जनतेवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांना वाचा फोडण्याचे व निवारण करणे हे त्याचे व कार्य.त्यांच्यावर मुधोळ तालुक्याच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली होती. कोंडलवाडीच्या रजाकाराने अर्जा पूरच्या वेशीजवळ पानसरे यांची तलवारीने हत्या केली.त्यांच्या सोबत असलेल्या-पंधरा सोळा वर्षाचा हंगीरग्याच्या पुंडलिक पाटलावर सुध्दा तलवारीने वार करून जखमी केले.

२१डिसेंबर १९४६ ला सायंकाळच्या वेळी उमरी स्टेशन येथील आर्य समाजाचे तरुण तडफदार कार्यकर्ते दत्ता उत्तरवार यांचा हैदराबादच्या स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या अरब पहारेकऱ्यांनी शुल्लक कारणावरून खून केला. नागेलीला पोलीस घोडदळांचा वेढा, उमरीचे बँक ऑपरेशन, इस्लापूर पोलीस ठाण्यावर हल्ला.कल्हाळीचे हत्याकांड देगलूरमधील हणेगाववरील रझाकारांची धाड, लोहा गावावर झालेला रझाकारांचा हल्ला व लूटालूट, अशा अनेक हिंसक घटनांचा साक्षीदार नांदेड जिल्हा आहे. निजाम व रझाकारांच्या जूलमी अत्याचाराला संपूर्ण मराठवाड्यातील जनता कंटाळून गेली होती. नुसत्या कल्पनेनेच अंगावर शहारे उभे राहणारे प्रसंग येथील जनतेने त्या काळी अनुभवले.

देगलूर तालुक्यातील पाळा गावच्या मठात राहणारे गोपाळ महाराज पाळेकर हे मुळ अहमदपूरचे राहणारे. मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या पाळकरांनी हैद्राबाद मुक्तिसंग्रामात कार्य करून सत्याग्रहासाठी तुरूंगवास व देहदंड सोसलेले स्वातंत्र्य सेनानी होत.

निजाम भारतात सामील व्हावे यासाठी झेंडावंदन व सत्याग्रहातून जनजागृती केली. जनतेला निजामाविरुद्ध पेटविण्याचे कार्य केले. निजाम सरकारच्या प्रशासनाला विरोध केला. पाळ्यातील व देगलुरमधील काही व्यक्ती २ जानेवारीला १९४७ला देगलुर येथे झेंडावंदन केले.

भारत माता की जय, वन्दे मातरम, निजाम को संघीराज मे शामील होना ही पडेगा.अशा घोषणा देत मिरवणूक काढली.एका पोलीस कॉनिस्टेबलला न जुमानता मिरवणुक चालू होती. पुढे विश्वंभरराव वसेकर या पोलिस इन्स्पेक्टरने त्यांना विचारलेल्या प्रश्नांना 'वंदेमातरम' हे एकच उत्तर दिल्यामुळे वसेकरांनी रूळ तुटेपर्यंत मारहान केली.गोपाळ पाळेकरांनी इन्स्पेक्टरलाच एक तडाखा देवून बदला घेतला. १७ सप्टेंबर १९४७ ला त्यांच्यासह पाळ्यातील इतर दोघांना शिक्षा झाली. औरंगाबादच्या सेंट्रल जेलमधून संडासमधील खिडक्यांच्या गजाळ्या कापून ४२ फुट उंचीवरून रात्री च्या सुमारास पटक्याच्या साह्याने उड्या मारून पळाले. पळण्याच्या या कटात त्यांच्यासोबत शंकरराव पटेल नागोराव पाठक, नागोरी काका, श्रीनिवास खोत, मुकुंदराव पेडगावकर हे होते.रात्री चंद्राच्या प्रकाशात एका ज्वारीच्या शेतात लपले. पोलीसांनी पाठलाग केला. व गोळीबारही केला. तेव्हा त्यांच्या अगदी जवळून गोळ्या गेल्या व कसेबसे वाचले. अनंत भालेरावाच्या ओळखीतून पुढे ते उमरखेड कॅम्प मध्ये सामिल झाले. हैद्राबाद स्टेट भारतात विलीन झाल्यानंतर गरीब मुसलमानांवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी अमिन समित्या स्थापन झाल्या त्यानुसार मुक्रमाबाद, हानेगाव या भागात ते काम केले.

## उमरी बँक ऑपरेशन

मराठवाडा मुक्ती लढ्यामध्ये उमरीचे फार मोठे योगदान आहे.. १९४१ साली महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन उमरी येथे झाले होते. हैद्राबादचे वकील काशिनाथराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिवेशनात स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवणे, मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह, शाळा काढणे, वेठबिगार बंद करणे यावर चर्चा झाली होती. विविध भागातील शेकडो प्रतिनिधी या परिषदेला हजेरी लावली होती. यातून कार्यकर्ते अधिक जोमाने कार्याला लागले.

डिसेंबर १६४६ मध्ये हैद्राबा द स्टेटबँकेच्या अरब पहारेकऱ्यांनी एक आर्यसमाजी कार्यकर्ता दत्ता उत्तरवार याचा खून केला होता. निजामाची सत्ता उलथविण्यासाठी विविध ठिकाणी सैनिकी कॅम्प उभारण्यात आले होते.त्यातून युवकांना प्रशिक्षण देऊन निजामाविरूद्ध लढा देण्यासाठी प्रवृत करण्यात येऊ लागले. त्याचेच उदाहरण उमरखेड कॅम्प होय.तेथून बऱ्याच चळवळी झाल्या. उमरी मुधोळ तालुक्यातील एक मोठी बाजारपेठ होती

निजाम सरकारला हादरा बसविण्यासाठी ऑपरेशन बँक करण्याचे ठरले व तशी रणनीती आखण्यात आली.त्याआधी १४ डिसेंबरला यांची रंगीत तालिम झाली होती.

२८ डिसेंबरला देवसरी येथे आबासाहेब लहानकरांकडे ३०-४० जनांची तुकडी शस्त्रास्त्रे आदी सामग्रीसह पोहचली. मुदखेड मुगट रेलवे लाईन उध्वस्त करण्यासाठीची एक जनांची तुकडी राजाराम देशमुखाच्या नेतृत्वाने निघाली. अमृतराव थेरबनकर यांच्या नेतृत्वाखालील एक तुकडी बेंबर भोकर रेल्वेलाईन आणि टेलीग्राम तारांची नासधुस करण्यास जबाबदारी घेतली होती. उमरी जवळील गोळेगाव येथे एक अशाच कामासाठीची तुकडी तैनात होती.उमरी बँकेवर हल्ला करण्याच्या तुकडीत अनंत भालेराव, आबासाहेब लहानकर, साहेबराव बारडकर, बन्सीलाल तोष्णीवाल, किशोर शहाणे, दिगांबर उत्तरवार, शंकरलाल शर्मा, धनराज पुरोहीत, रघुनाथ पंडीत, काशीराम शेट्टी हे होते.

मोहण शर्मा, जगदीश आर्य, कुंटूरकर यांनी व त्यांच्या सहकार्यान प्रथममोठ्या हिंमतीने उमरी रेल्वे स्टेशन ताब्यात घेतले. ताबा मिळवताच ग्रेनेडचा स्फोट घडविण्यात आला.नागनाथ परांजपे यांनी पोलीस ठाण्यात सशस्त्र प्रवेश केला. भीमराव देशमुखाने गोळीबार केले. दोन कॉन्स्टेबलवर गोळ्या झाडल्या. तेथील बंदुका ताब्यात घेवून मोंढयाकडे निघाले.दुपारी धनजी शेठ हे रघुनाथ पंडित सह बँकेत वाट पाहत बसले होते. अनंत भालेराव, लहानकर व एक सहकारी रिवॉल्वरसह बँकेत घुसले. शस्त्रधारी बन्शीलाल ने अरब पहारेकऱ्याला गोळी झाडून आडवे केले. पुढे आबासाहेब लहानकराने कॅशिअर गिरगावकर यावर गोळी झाडली. धनजीभाई, रघुनाथ पंडीत यांच्या सहकार्यने तिजोरीतील नोटा पोत्यात भरल्या. आठरा पोते भरले. तिकडे मोंढयाच्या चहूबाजूंनी सैनिक लक्ष ठेवून उभे होते. या प्रकरणात एक अरब पहारेकरी, एक चपरासी, मैनेजर यासह अन्य काही रझाकार असे पंधरा लोक ठार झाले होते. बैलगाडीने ही रक्कम उमरखेड कॅम्पकडे पाठविण्यात आली. ही रक्कम होती २०लाख ६६ हजार.उमरी रेल्वेस्टेशन, उमरी पोलीस स्टेशन व उमरी बँक या तीन हल्यातून यशस्वीपणे पार पडली.

उमरी बँक ऑपरेशन कडे काहीजन संशयाच्या नजरेने पाहत होते. लुटीच्या रकमेचे जेव्हा ऑडीट झाले तेव्हा स्वातंत्र्यसैनिकांचा प्रामाणिकपणा दिसून.

## अखेर स्वातंत्र्य मिळाले

१३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्य पोलीस कार्यवाही करावे लागली या घटनेला ऑपरेशन पोलो असेही म्हणतात.भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई केली होती परंतु लष्करी कारवाई म्हटल्यास कायदेशीर प्रश्न निर्माण होईल या कार्यवाहीस पोलीस अॅक्शन असे नाव कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविले.. स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू यांनी पंडित

नेहरू, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशी चर्चा करून पोलीस कार्यवाही करण्याची विनंती केली होती.
त्यामुळे १३ सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजता पोलीस कार्यवाही सुरू झाली. या पोलीस कार्यवाहीचे प्रमुख संचालन लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्र सिंहजी सदर्न कमांड होते.हैदराबाद राज्यात एकाच वेळी पाच दिशेने भारतीय लष्कराने प्रवेश करून कार्यवाही सुरू केली सोलापूर हुन प्रवेश करणाऱ्या सशस्त्र दलाचे कमांडर मेजर जनरल जयंतीनाथ होते.सोलापूरच्या उत्तरेस मुंबई विभागातील दलाचे कमांडर मेजर जनरल डी.एस.ब्रार, मध्यप्रांत व व-हाड चे कमांडर ब्रिगेडियर शिवदत्त सिंग, मद्रास समितीचे कमांडर मेजर जनरल ए.ए. सुंदरा, संपूर्ण हवाई हालचालीत व कृतीचे नियंत्रक एअर व्हाईस मार्शल मुखर्जी होते तर उत्तर विभागामध्ये औरंगाबाद, परभणी, नांदेड आदिलाबाद व निजाम या विभागाचे प्रमुख कमांडर ब्रिगेडियर तौफिक अली होते, पूर्व विभागात करिमनगर, वरंगल वनलगोंडा जिल्ह्याचा समावेश होता येथील प्रमुख ब्रिगेडियर महंमद हुसेन खान होते.दक्षिण विभागात गुलबर्गा, रायपूर व महबूबनगर या जिल्ह्याचा समावेश होता या विभागाचे प्रमुख लेफ्टनंट कर्नल अली अहमद होते तर पश्चिम विभाग म्हणजे उस्मानाबाद व बीड जिल्ह्याचा समावेश होता या विभागाचे प्रमुख ब्रिगेडीयर सईदी हमीद अहमद हे होते.
भारतीय लष्कर पाच भिन्न दिशेने हैदराबाद राज्यात प्रवेश करून निजामी पोलीसांशी झुंज दिली रझाकार व निजामी पोलीस भारतीय लष्करा पुढे टिकले नाहीत. १७ सप्टेंबर ला सायंकाळी पाच वाजता निजाम मीर उस्मान अली खान बहादुर या निजामाने रेडिओ स्टेशनवर भाषण केले व आपण युद्ध थांबवित असल्याची घोषणा केली.त्यानंतर हैदराबाद लष्कराचे प्रमुख शरण आले. १०९ तासात कारवाई पोलीस कार्यवाही यशस्वी झाली. हैदराबाद राज्यातली जनता निजामाच्या जाचातून मुक्त झाली. स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.मेजर जनरल चौधरी हैदराबाद राज्याचा राज्य कारभार ताब्यात घेतला व पुढील चौदा महिने तेथे लष्करी राजवट होती.
मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्यात अर्थात अखंड भारत निर्मितीच्या चळवळीत हौतात्म्य पत्करलेल्या व मुक्तीलढयात कार्य केलेल्या सर्व ज्ञात अज्ञात क्रांतीकारकांच्या स्मृतीस विनम्र
अभिवादन ।

## निष्कर्ष

भारताला स्वातंत्र मिळाल्यावर तब्बल तेरा महिन्यांनी म्हणजे १७ सप्टेबर १९४८ ला मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. मराठवाड्यातील जनतेच्या अपार परिश्रमाने व भारत सरकारच्या पोलीस ॲक्शशमुळे हैद्राबादचा निजाम शरण आता व संस्थान भारतात विलिन झाले.
मराठवाडा मुक्ति संग्रामात नांदेड जिल्हयातील सहभाग वाखाणण्याजोगा आहे. अखंड भारताचे स्वप्न साकार झाले. १७ सप्टेबर २०२२ ते १७ सप्टेबर २०२३ या कालावधीत मराठवाडा मुक्ति संग्रामाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यामुळे मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. या अनुषंगाने या अमृत महोत्सवी वर्षात विविध स्तरावर कार्यक्रम, प्रदर्शने, पुस्तक प्रकाशने आदी उपक्रम राबविण्यात आले व मराठवाडा मुक्ति संग्रामात आपले प्राण गमावलेल्या व लढलेल्या स्वातंत्र्य सेनानी व स्वातंत्र्य सैनिकांचा त्याच्या पत्नींचा गौरव करण्यात आले व खऱ्या अर्थाने ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांस आदरांजली वाहण्यात आली ।

## संदर्भ ग्रंथ


1. प्रमोदिनी बिंदू-हैद्राबाद राज्याचे विसर्जन, दिगंबरराव बिंदू आत्मकथन-साकेत प्रकाशन
2. अनंत आलेराव-हैद्राबादचाचा मुक्तिसंग्राम व मराठवाडा
3. दग जाफराबादकर-व-हाड व-हैद्राबाद मुक्ति संग्राम
4. शिवानी गऊळकर-बखर अनामिकांची
5. कौस्तुभ दिवेगावकर, रूपाली आवले, भाऊसाहेव उमाटे, केतन पूरी-हैदराबाद्चा स्वातंत्र्यलढा मराठवाड्याची मुक्तिगाथा
6. डॉ अनिल कठारे-मराठवाड्याचा इतिहास
7. रघुनाथ रांजणीकर-नांदेड जिल्हयातील स्वातंत्र्यलढा.
8. अशोक काकोडकर-पूर्व दिव्य